# वित्तीय व्यवस्थापनाचा प्रशिक्षण कार्यक्रम ११ पासून

**औरंगाबाद, दि.६ (लोकमत ब्युरो)-** इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अ‍ॅण्ड वर्क्स अकाऊंटंटस् ऑफ इंडियाची (आय.सी.डब्ल्यू.ए.आय.) औरंगाबाद शाखा आणि लघुउद्योग मंत्रालयांतर्गत येणाऱ्या लघुउद्योग सेवा संस्थानची (एस.आय.एस.आय.) औरंगाबाद शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते १५ नोव्हेंबर या काळात वित्तीय व्यवस्थापनाचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

आय.सी.डब्ल्यू.ए.आय. च्या औरंगाबाद शाखेचे उपाध्यक्ष नितीन शर्मा, कोषाध्यक्ष गिरीश कुलकर्णी आणि एस.आय.एस.आय. चे उपसंचालक के. जयचंदीरन् यांनी एका पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले की, पाच दिवसांच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात स्थानिक चार्टर्ड अकाऊंटंटस्, बँक अधिकारी आणि अन्य तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. या प्रशिक्षण कार्यक्रमात लघु उद्योगातील वित्त विभागाचे अधिकारी, मुख्य अधिकारी आणि अन्य संबंधित लोक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. यावेळी वित्तीय लेखा, त्याचे विश्लेषण, खेळते भांडवल, कर्ज, प्रकल्प अहवाल, आर्थिक स्रोत, मूल्य निश्चिती, कर आणि इतर विषयांवर चर्चा केली जाईल.

अधिक माहितीसाठी त्रिमूर्ती चौक येथील चेतन सुपर मार्केटमधील आय.सी.डब्ल्यू.ए.आय. च्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेस संजय भावठाणकर, रविकिरण पाटील, शिरीष जोशी यांच्यासह अनेक जण हजर होते.